जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२९/१२/२०२३
## दि.२८/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८५७/२०२३,भादविक ३०२,३२३,३४,शस्त्र अधिनियम कलम ४(२५),भारतीय कारगृह कायदा कलम ४५(१)(२)(४),महाराष्ट्र कारगृह शिस्त नियम क्र.२६,उपनियम २,३,८, १०,१२,३५,४१,४३ अन्वये |
| **फिर्यादी** | श्रीकांत मोरे,जेल पोलीस अंमलदार, येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे |
| **आरोपीत** | १)न्यायबंदी क्र.३४०४/२३ २)न्यायबंदी क्र.४७४६/२३ ३)न्यायबंदी क्र.३४०३/२३ ४)न्यायबंदी क्र. ९४१/२३,सर्व रा.येरवडा कारागृह सर्कल नं.०२,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/१२/२०२३ रोजी ०३/१० वा.येरवडा कारागृह सर्कल नं.०२,बॅरेक नं.०१ समोरील मोकळ्या जागेत पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद येरवडा कारागृहा मधील आ.क्र.१ ते ४ न्यायबंदी यांनी आपसात संगनमत करून,जुन्या भांडणाच्या कारणावरून येरवडा कारागृहातील न्यायबंदी महेश महादेव चंदनशिवे, वय-२६ वर्षे याचे मानेवर,पोटावर कैची व बिजागरीचा तुकडयाने वार करून,तसेच लाथा-बुक्यांनी मारहाण करून,त्यास गंभीर जखमी करून,त्याचा खुन केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, लहाने ८८८८८१३६४७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ३५६/२०२३,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ७२ वर्षे,रा.आंबेगाव-खुर्द,जांभुळवाडी,पुणे |
| **आरोपीत** | चांदबाबु अलीहुसेन शेख,वय ३० वर्षे,रा.स.नं.४२,बेचाळीस चौक,कोंढवा-खुर्द,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/१२/२०२२ रोजी १८/०० वा. स्वारगेट ते जांभुळवाडी या रूटवरील बस मध्ये पद्मावती बस स्टॉप ते के.के.मार्केट चौक अशा बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान यातील नमुद इसमाने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे हातातील एक सोन्याची बांगडी ४०,०००/- रुपये किंमती त्याचेकडील लोखंडी लहान कटरने कापुन,जबरी चोरी करून फिर्यादीस धक्का देवुन पळुन जात असताना,सदर इसमास फिर्यादी व नागरीकांनी तसेच गस्तीवरील पोलीसांनी फिर्यादी यांचे ऐवजासह ताब्यात घेतले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. राहुल खंडाळे ९५५२६३५१५१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ४०१/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | सुरेश देवतवाल,वय-५६ वर्षे,रा.मांजरी-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/१२/२०२३ रोजी रात्रौ २२/३० वा.ते दि.२८/१२/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा.चे दरम्यान वास्तुश्री ॲडरिना सोसायटी,मांजरी रोड,केशवनगर,मुंढवा,पुणे येथील विरांश वाईन्स शॉप दुकाना मध्ये |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे विरांश वाईन्स शॉप मध्ये मॅनेजर म्हणुन नोकरीस असुन,त्यांचे वाईन्स शॉपचे शटर कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे वाईन्स शॉपचे शटर कशाचेतरी सहायाने उचकटुन,वाईन्स शॉप मध्ये प्रवेश करुन,शॉप मधील कॅश कांऊटरच्या ड्रॉव्हर मधुन ४,१९,५००/- रूपये रोख रक्कम व विविध कंपनीच्या दारुच्या बॉटलचे बॉक्स व इतर बॉटल्स असा एकुण ४,६०,५७०/- रूपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, संदीप जोरे ९४०३५४७५०१ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ६४७/२०२३,भादविक ३९२,३४१,५०४,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३५ वर्षे,रा.कलवडवस्ती,लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम व त्यांचे मोटार सायकलवरील दोन अनोळखी साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/१२/२०२३ रोजी सकाळी ११/३० वा. अमन मेडीकल समोरील रस्त्यावर,संजय पार्क, विमाननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचेकडील मोपेडवरून जात असताना,यातील नमुद इसमांनी व त्यांचे मोटार सायकलवरील दोन अनोळखी साथीदार यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करुन,एका खासगी बँकेकडुन रिकव्हरीकरीता आल्याचे सांगुन, त्यांची ओळख पटवुन न देता,फिर्यादी यांचेकडील निळया रंगाची ॲक्टीव्हा ५-जी दुचाकी, तीचा आरटीओ नंबर एमएच-१२/आरसी-००१४ ही ४२,०००/- रु किची जबरदस्ती व जुलमाने चोरी करुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, विजय चंदन ८२७५५२२६९७ / ८३५५९१६७३१ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ६४५/२०२३,भादविक २७९,३०४(अ),मोटार वाहन कायदा कलम १८४, १९९/१७७ |
| **फिर्यादी** | कपिल भाकरे, पोलीस अंमलदार, विमानतळ पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | सिमेंट ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/१२/२०२३ रोजी दुपारी १५/३० वा.जनक बाबा दर्गा चौकाचे समोरील सिंग्नल जवळ नगरकडुन पुणेकडे जाणारे रोडवर,खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद सिमेंट ट्रकवरील चालकाने त्याचे ताब्यातील सिमेंट ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एक पादचारी अनोळखी इसम,वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, कदीर देशमुख ८४२१०३१५७३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**